# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२८०८**
**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००२८०९**

**अपिलार्थी श्री. किशोर पुरोहित**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता- २ (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रू.नं. ५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रू.नं. ५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.०९.२०२६**

अपीलकर्ता .: अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०५.२०२५ | | १५.०७.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.११.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. १६.०५.२०२५ रोजीच्या दोन माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१)(ख) नुसार १ ते १७ बाबींची माहिती अद्ययावत करून दर्शनी भागात प्रदर्शित करून नागरिकांना पाहण्यासाठी खुली ठेवणे कायद्याने बंधनकारक असल्यामुळे आपल्या कार्यालयातर्फे कोणत्या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आलेले आहे याची माहिती देऊन तसेच ४(१)(ख) बाबींची प्रती देण्यात याव्यात."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १५.०७.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०२.०९.२०२६ रोजीचे पत्र आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थींना मागणी केलेली माहिती दाखविण्यात आलेली आहे व अपिलार्थींनी त्यांना लिहून दिलेले आहे की, मागितलेली माहिती प्राप्त झालेली आहे व पूर्ण समाधान झालेले आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपील निकाली काढण्याची विनंती केली.

..२/-

४. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**सदर दोन्हीही अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

State Information Commission Greater Mumbai

7-9-2026

**मुंबई**
**दिनांक : ०७.०९.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ